आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२२ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पोलंड दौऱ्यात, दोन्ही देशांमधले संबंध धोरणात्मक भागिदारीत परिवर्तित करण्याचा निर्णय

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ‘राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार’ प्रदान, महाराष्ट्रातल्या ६ शास्त्रज्ञांचा गौरव

- बदलापूरमधल्या लौंगिक अत्याचार प्रकरणी स्वतःहून दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाकडून सुनावणी, पोलिसांनी आपली भूमिका बजावली नसल्याची न्यायालयाची स्पष्टोक्ती /राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश

- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ लांबणीवर

**आणि**

- देशाच्या पूर्व, पश्चिम, वायव्य आणि मध्य भागात पुढचे ४ दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><><>**

भारत आणि पोलंडनं परस्परांबरोबरचे संबंध धोरणात्मक भागीदारीत परिवर्तित करण्याचा निर्णय घेतल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. वॉर्सा इथं पोलंडचे प्रधानमंत्री डोनाल्ड टस्क यांच्या बरोबर झालेल्या चर्चेनंतर त्यांनी हे निवेदन जारी केलं. दोन्ही देशांमधल्या राजनैतिक संबंधांचं

यंदा ७० वं वर्ष असून, भारत-पोलंड संबंध लोकशाही आणि कायद्याचं राज्य यासारख्या सामायिक मूल्यांवर आधारित असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणा येण्याची गरज आहे, यावर दोन्ही बाजूंमध्ये सहमती झाल्याचं यात म्हटलं आहे.

युक्रेन आणि पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला संघर्ष सर्वांसाठी चिंतेचा विषय असून, कोणतीही समस्या युद्धभूमीवर सोडवली जाऊ शकत नाही यावर भारताचा ठाम विश्वास असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी आणि पोलंडचे प्रधानमंत्री  टस्क यांच्यात झालेल्या चर्चेमध्ये द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्यात आला आणि विविध मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण झाली. या  बैठकीमुळे परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात देशातल्या नामवंत शास्त्रज्ञांना २०२४ सालचे  ‘राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार’ प्रदान केले. यामध्ये महाराष्ट्रातल्या ६ शास्त्रज्ञांचा समावेश आहे. प्रा.  गोविंदराजन पद्मनाभन यांना यावेळी ‘विज्ञानरत्न २०२४’ पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. मुंबईतल्या भाभा अणु संशोधन केंद्रातले डॉ. आवेश कुमार त्यागी यांना अणुऊर्जा क्षेत्रातल्या विज्ञान श्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

पुण्यातल्या भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतले प्रा. जयंत उदगावकर यांना जीवशास्त्रातला विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयआयटी मुंबई इथले प्रा. रोहित श्रीवास्तव यांना तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातल्या योगदानासाठी विज्ञान श्री पुरस्कार मिळाला.

विज्ञान युवा- शांतिस्वरुप भटनागर पुरस्कारांमधे मुंबईतल्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च मधले प्रा. विवेक पोलशेट्टीवार यांना रसायन विज्ञान क्षेत्रातल्या योगदानासाठी, पुण्यातल्या आयसीएमआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी मधल्या डॉ. प्रज्ञा यादव यांना वैद्यकीय चिकित्सा, तर पुण्यातल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी या संस्थेतले डॉ. रॉक्सी मॅथ्यू कोल यांना पृथ्वी विज्ञान क्षेत्रातल्या योगदानासाठी पुरस्कार देण्यात आला.

**<><><><><><>**

बदलापूरमधल्या शाळेत लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची स्वतःहून दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं आज सुनावणी घेतली. या प्रकरणी पोलिसांनी त्यांची भूमिका बजावली नसल्याचं सांगत न्यायालयानं तीव्र नाराजी व्यक्त केली. लैंगिक अत्याचार झाला आहे याची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करायला हवा होता, मात्र बदलापूरमधल्या जनक्षोभानंतरच पोलिसांनी कारवाई केली, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

मोठा जनक्षोभ उसळल्याशिवाय यंत्रणा काम करत नाही, ही आता सामान्य बाब झाली आहे. लोकांना रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याची वेळ येऊ नये. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांबाबत पोलीस दल संवेदनशील बनवण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असं न्यायालयानं सांगितलं.

याप्रकरणी संबंधित शाळेनं कोणतीही कारवाई केली नाही, पोलिसांनाही कळवलं नाही. त्याबद्दल शाळेवर कारवाई केली पाहिजे.

याप्रकरणी सरकारनं काय पावलं उचलली आहेत, आणि शाळांमधे मुलामुलींच्या सुरक्षेसाठी काय पावलं उचलणार आहात, याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करा, असे निर्देश न्यायालयानं महाअधिवक्त्यांना दिले. पुढची सुनावणी २७ ऑगस्टला होणार आहे.

**<><><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्शवभूमीवर येत्या २४ तारखेला महाविकास आघाडीनं महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदमागे कोणतंही राजकारण नसून महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी बंद पुकारला असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज स्पष्ट केलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

या लैंगिक अत्याचार प्रकरणातली संबधित शाळा भाजपा आणि आरएसएस विचारांची असल्यानं पोलिसांवर दबाब टाकण्यात आल्याचा आरोप कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. शाळेच्या संस्था चालकांवर दबाव आणून १२ आणि

१३ तारखेचे सीसीटीव्ही फूटेज गायब करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. २४ तारखेला महाविकास आघाडीच्या आंदोलनात सर्वांनी सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

जेएनपीएच्या माध्यमातून वाढवण बंदराची उभारणी होत असून, प्रकल्पाच्या माध्यमातून दहा लाख रोजगाराची निर्मिती होणार असल्याची माहिती केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग  मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज सांगितलं. त्यांनी आज जेएनपीएला भेट देऊन पाहणी केली, त्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. वाढवण बंदर हे देशातं सर्वोत्तम बंदर बनणार असून, कमीत कमी वेळेत या बंदराचं काम पूर्ण केलं जाईल, असं ते म्हणाले. जेएनपीए हे हरित बंदर केलं जाणार असून, तिथून अल्पावधीत एक कोटी कंटेनरची वाहतूक केली जाईल, असं सोनोवाल यांनी सांगितलं. पालघर जिल्ह्यात होणाऱ्या वाढवण बंदराचं भूमिपूजन येत्या ३० तारखेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सोनोवाल यांनी आज पालघर जिल्ह्याचा दौरा केला, आणि सिडको मैदानावर जाऊन भूमिपूजन कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. परीक्षेची नवी तारीख लवकरंच जाहीर

करण्यात येईल असं आयोगानं समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><><>**

मुंबई महानगर आणि परिसराचा जीडीपी, अर्थात स्थूल अंतर्गत उत्पादन पाच वर्षांत दुप्पट करण्याचं उद्दिष्ट असून त्यासाठी सात विविध क्षेत्रांवर निती आयोगानं लक्ष केंद्रित केलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. मुंबई महानगर आणि परिसर जागतिक आर्थिक केंद्र बनवण्यासाठी निती आयोगानं केलेल्या अभ्यासाचा अहवाल आज मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

निती आयोगानं केलेल्या अभ्यासात मुंबई महानगरासह पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या परिसराच्या विकासाचं उद्दिष्ट ठेवलं आहे. सध्या या परिसराचं स्थूल अंतर्गत उत्पादन १२ लाख कोटी रुपये आहे. २०३० पर्यंत ते २६ लाख कोटी रुपये करण्याचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी मुंबईत ग्लोबल सर्विसेस हब, परवडणाऱ्या घरांना चालना, या परिसराला जागतिक पर्यटन केंद्र बनवणं, परिसरातल्या बंदरांचा एकात्मिक विकास करून उद्योग आणि लॉजिस्टीक हब करणं, सुनियोजित शहरांचा विकास, सर्वसमावेशकता आणि शाश्वतता, तसंच जागतिक दर्जाच्या नागरी पायाभूत सुविधा अशा सात बाबींवर भर देत, आर्थिक वृद्धीचा वेग वाढवला जाणार आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज उत्तर मुंबईतल्या प्रकल्पांची पाहणी केली. 'उत्तर मुंबई ही उत्तम मुंबईत परिवर्तित होणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. त्यांनी चिंचोली इथल्या शताब्दी महानगरपालिका शाळेला भेट देऊन तिथल्या सुविधांचा आढावा घेतला. त्यानंतर गोयल यांनी मालाड इथल्या काम सुरु असलेल्या मीठ चोकी उड्डाणपूलाची पाहणी केली. मालाड इथं निर्माण होत असलेल्या ६०० एकरच्या वेदिक पार्कची पाहणी त्यांनी केली.

**<><><><><><>**

कोलकाता इथल्या आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयलामधील निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्येप्रकरणी सीबीआयनं आणि कोलकाता पोलिसांनी आज सर्वोच्च न्यायालयासमोर स्थिती अहवाल सादर केला. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनजंय चंद्रचूड यांनी आंदोलक डॉक्टरांना कामावर परत येण्याचं आवाहन केलं. या आंदोलनाचा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो असं न्यायमूर्ती म्हणाले. डॉक्टरांच्या विविध संघटनांनी या प्रकरणी हस्तक्षेप करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><><>**

देशाच्या पूर्व, पश्चिम, वायव्य आणि मध्य भागात पुढचे ४ दिवस मुसळधार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर पुढले ७ दिवस दक्षिण द्वीपकल्पात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

कोकण, गोवा, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड,आणि गुजरातमध्ये येत्या २६ ऑगस्ट पर्यंत, तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पुढले ५ दिवस जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

//<><><><><><>//